स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीचे "सदस्य सचिव"
<u>यांना कर्मचारी वृंद मजुर करणेबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र.संकिर्ण-२००६/प्र.क्र.१४३/स्वासैक-१,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,**
**दिनांक : २ जानेवारी, २००७.**

पहा :- शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.संकीर्ण-२००६/प्र.क्र.१४३/स्वासैक-१, दि.१/९/२००६ व दि.१९/१०/२००६

**<u>शासन निर्णय</u>** :-

संदर्भाधीन दि.१/९/२००६ येथील नमुद शासन निर्णयान्वये स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीच्या सदस्य सचिव पदावर श्री.भि.दा.भिलारे (गुरुजी) यांची नियुक्ती करण्यात आली असून दि.१९/१०/२००६ च्या शासन निर्णयाद्वारे त्यांना महाराष्ट्र शासनाच्या राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात आला आहे. सदस्य सचिव यांना शासन निर्णय वित्त विभाग क्र.शासाउ-१०.०२/प्र.क्र.६/०३/सा.उ., दि.२२/८/२००३ मधील जोडपत्र-२ च्या रकाना ८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सोईसुविधा अनुज्ञेय राहतील. वित्त विभागाच्या सदर शासन निर्णयानुसार स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पार पाडण्यासाठी त्यांना खालील प्रमाणे कर्मचारी वृंद शासन मंजुर करीत आहे.

| अ.क्र. | पदनाम | मंजुर कर्मचारी वर्ग | संवर्ग ज्यातून प्रतिनियुक्ती करण्यात यावी. |
|---|---|---|---|
| १ | स्वीय सहायक | १ | शासनातील उपसचिव दर्जाच्या अधिका-यास अनुज्ञेय असलेल्या दर्जाचे. |
| २ | लिपिक | १ | लिपिक-टंकलेखक, टंकलेखक, लिपिक. |
| ३ | शिपाई | १ | चतुर्थश्रेणी कर्मचारी. |

२. वर नमुद केलेल्या कोणत्याही पदावर करार पध्दतीने, बाहय उमेदवाराची नेमणूक करण्यात आल्यास त्यांच्या वेतन व भत्याबाबतची वित्त विभागाच्या सहमतीने आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. बाहेरील उमेदवाराची नियुक्ती केल्यास तीसदस्य सचिव यांच्या कालावधी पुरती मर्यादित व कंत्राटी पध्दतीची असेल. त्यांची सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता व कोणतेही कारण न दाखवता कधीही संपुष्टात आणण्याचा अधिकार शसनास राहील. बाहेरील उमेदवारास शासकीय/निमशासकीय सेवेत सामावून घेण्याचा हक्क रहाणार नाही.

४. शासनाचे अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग का.क्र.२६ (रोख शाखा) यांना स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीच्या सदस्य सचिव व त्यांच्या कर्मचारी वृंदाच्या देयकासंबंधी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे आणि सह/उप सचिव (रोख शाखा) सामान्य प्रशासन

विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना सदर देयकावर प्रती स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. समितीचे सदस्य सचिव यांच्या कार्यालयीन खर्चा संबंधीची देयके सह/ उप सचिव (रोख शाखा) हे प्रमाणित करतील.

५. उच्चाधिकार समितीच्या सदस्य सचिव कार्यालयातील कर्मचारी वृदांच्या नियुक्तीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

६. या प्रस्तावावरील खर्च मागणी क्र.ए-५ लेखाशिर्ष क्र.२२५१-सचिवालय-सामाजिक सेवा (०९२) इतर कार्यालये (००) (०१) स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती (२२५१०३२१) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकरण्यात यावा व त्याखाली केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.अनौसं.७६३/०६/व्यय-४, दि.१८/१०/२००६ तसेच अनौसं-२८४/०६/साऊ, दि.१८/१०/२००६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्मिता मंत्री)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
२) मा.श्री.भिकू दाजी भिलारे (गुरुजी), मु.पो.भिलारे, ता.महाबळेश्वर, जि.सातारा,
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई, नागपूर,
४) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई, नागपूर,
५) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर,
६) वित्त विभाग, व्यय-४/सा.ऊ., मंत्रालय, मुंबई,
७) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना)/रोख शाखा (२ प्रती)
८) निवड नस्ती/स्वासैक-१.